# प्रकरण *3* जमातवाद*:* विचार आणि पध्दती

## जातियवादाचा विकास आणि भारताची फाळणी

*(GROWTH OF COMMUNALISM AND THE PARTITION OF INDIA)*

*One Communalism does not end the other; each feeds on the other and both fatten. - Jawaharlal Nehru. The British were neither the foes of the Hindus nor friends of the Muslims. They set up Pakistan not as a gesture of friendship towards the Muslims, but under the compulsion of their international policies. -* ***Wali Khan***

भारतातील जातियवादाच्या समस्येला केवळ हिंदू-मुस्लिम प्रश्न किंवा ह्या दोन धर्मातील विरोध असे म्हणणे योग्य होणार नाही. हया समस्येला धार्मिक कमी आणि राजकीय जास्त असा आधार आहे. ह्याशिवाय तिसराही एक पक्ष इंग्रजांच्या रुपाने होता. अशाप्रकारे ह्या त्रिकोणाची सर्वात मजबूत बाजू म्हणजे इंग्रज होते. ते मुसलमानांचे मित्र नव्हते। तसेच हिंदूंचे शत्रू नव्हते, त्यांचे उद्दिष्ट ब्रिटीश साम्राज्यवाद होते आणि त्यासाठी मार्ग होता, "विभाजित करा व राज्य करा" (*Divide and Rule).* १८५३ ते १८६० मधे मुंबईचा गव्हर्नर असलेल्या जॉन एल्फिन्स्टनने म्हटले होते की, "विभाजित करा व राज्य करा" ही प्राचीन काळातील रोमन म्हण होती आणि ती आमचीही असायला हवी. प्रशासकीय अधिकारी असलेल्या जॉन स्ट्रैचीने असे लिहिले होते की, "भारतातील भिन्न भिन्न तत्वांमधे विरोध असणे आमच्या राजकीय स्थितीच्या दृष्टिने चांगले आहे." १८५७ च्या उठावात बहादुरशाह जफरला पुन्हः सम्राट बनविण्याचा प्रयत्न झाल्याने मुसलमानांबद्दल इंग्रजांच्या मनात कटू भावना होती. वहाबी आंदोलनाने ती अधिकच तीव्र बनली. त्यामुळे इंग्रजांनी मुसलमानांमा दडपून टाकण्याच्या धोरणाचा अवलंब केला. परंतु हिंदूंमधे जसजशी राजकीय जागृती निर्माण झाली आणि त्यांनी राजकीय अधिकारांची मागणी सुरू केली तसतसे इंग्रजांचे धोरण बदलत गेले. १८८० च्या सुमारास हे स्पष्ट झाले की, राजकीय, आर्थिक व शिक्षणक्षेत्रात मागासलेल्या मुसलमानांपेक्षा हिंदू ब्रिटीश साम्राज्याकरिता अधिक धोकेदायक वाटू लागले, परिणामी दोन्ही धर्माबद्दलचे इंग्रजांचे धोरण विशिष्ट आकार घेऊ लागले. त्यात अँग्लो-इंडियन नोकरशाहीचा विशेष वाटा होता. १८७१ मधे प्रकाशित झालेल्या 'भारतीय मुसलमान (*The Indian Mussalmans)* ह्या आपल्या पुस्तकात डब्ल्यू डब्ल्यू, हंटर म्हणतो की, मुसलमान इतके दुर्बल आहेत की, ते बंड करूच शकत नाही. त्याचबरोबर हंटरने मुसलमानांबद्दलच्या धोरणात बदल सुचविला. नुकत्याच स्थापन झालेल्या अलीगडच्या एम.ए.ओ. कॉलेजचे प्रिन्सिपॉल चिकोडोर बेकने मुसलमानांमधे जागृती घडवून आणण्याचे विशेष कार्य केले आणि इंग्रजांच्या मुसलमानविषयक धोरणाला प्रभावित केले. सय्यद अहमदखौं - राष्ट्रवादाकडून जातियवादाकडे -प्रारंभिच्या काळात हिंदू-मुस्लिम ऐक्याचे कट्टर समर्थक असलेले सय्यद अहमदखौं पुढे कॉंग्रेसचे कट्टर विरोधक आणि ब्रिटीश साम्राज्याचे समर्थक बनले. सुरुवातीच्या काळात त्यांनी हिंदू व मुसलमानांना सुंदर वधूचे (भारत) दोन डोळे अशी उपमा दिली. १८८४ मधील एका भाषणात अहमदखौं म्हणाले, "तुम्ही एकाच प्रदेशाचे रहिवाशी नाही? हिंदू व

मुसलमानांमधे फक्त धर्माची भिन्नता आहे अन्यथा सर्व लोक, हिंदू, मुसलमान अथवा खिश्चन एकाच राष्ट्राशी संलग्न आहेत." पंजाबमधील हिंदूंसमोर बोलताना ते म्हणाले, "भारताचा प्रत्येक नागरिक हिंदू आहे....मला खेद आहे की, तुम्ही मला हिंदू मानीत नाही" त्याचवर्षी पंजाबमधील गुरुदासपूर येथे बोलताना सय्यद अहमदखौं हयांनी म्हटले की, "आम्ही मनाने व हृदयाने एक होण्यचा प्रयत्न केला पाहिजे; कार्यही एकत्र केले पाहिजे. जर आम्ही एक झालो तर परस्परांचा आधार बनू शकतो आणि असे न करता एकमेकांचा विरोध करीत राहिलो तर आम्हा दोघांचाही नाश होईल."

मात्र हळूहळू सय्यद अहमदखौंच्या विचारांमधे बदल होऊ लागला. १६ मार्च १८८८ रोजी मिरत येथे केलेल्या भाषणात ते म्हणाले की, हिंदू व मुसलमान दोन राष्ट्र आहेत एवढेच नाही तर ते विरोधी राष्ट्र आहेत. (*Hindus and Muslims were not only two nations, but as two warring nations who could never lead a common political life, should ever the British quit*

*India.)* त्यांच्या ध्येयधोरणात असा अचानक बदल को झाला? स्थानिक मंडळे तयार करण्यासाठी निवडणूक प्रक्रिया सुरू होताच स्वतंत्र मतदारसंघाची मागणी करण्यात आली. रिपनच्या स्थानिक स्वराज्य विधेयकावर केंद्रीय कायदेमंडळात बोलताना त्यांनी दोन्ही जमाती व धर्मातील महत्वाच्या भेदाविषयी व दोन्ही धर्मियांनी अंगिकारलेल्या शिक्षणाच्या भिन्न दर्जाविषयी विचार व्यक्त केले व स्पष्ट केले की, सर्वसाधारण निवडणूक पद्धतीचा अवलंब केल्यास मोठी जमात लहान जमातीकडे दुर्लक्ष करील. आता अहमदखों पूर्णतः मुसलमानांचे पक्षपाती बनले. आपली जमात राजकारण व शिक्षण क्षेत्रात पूर्णतः मागासलेली आहे हयाची त्यांना जाणीव होती. आपल्या जमातीला पुरेसे प्रतिनिधीत्व मिळणार नाही हे लक्षात येताच ते ह्या निष्कर्षावर आले की, प्रातिनिधीक व जबाबदार प्रकारच्या पश्चिमेकडील राजकीय संस्थांसाठी अजून भारतीय परिपक्व झाले नाहीत. अहमदर्त्यांच्या हह्या विचारांनी हिंदूंबद्दल भयगंड निर्माण होऊन मुसलमान वेगळ्या मार्गाने विचार करू लागले, जाऊ लागले.

परिस्थितीचा अचूक फायदा घेऊन अँग्लो-इंडियन प्रशासकांनी हिंदू व मुसलमानांमधील भेदाला खतपाणी घातले. अलीगड कॉलेजच्या आरंभिच्या तीन प्रिन्सिपॉलांनी (बेक, मॉरिसन, आर्थबोल्ड) अलीगड चळवळीला इंग्रज समर्थक व हिंदू विरोधाचे रुप दिले. अलीगड चळवळीने मुसलमानांच्या मनात ब्रिटीश राजपदाविषयी निष्ठेची भावना निर्माण केली आणि भारताच्या राजकीय जीवनापासून दूर रहाण्याची प्रेरणा दिली. ऑगस्ट १८८८ मधे सय्यद अहमदखाँने 'संयुक्त भारतीय राजनिष्ठ सभा' *(United Indian Patriotic Association)* स्थापन केली. त्यामागील प्रमुख उद्देश काँग्रेसच्या प्रचाराला विफल बनविणे आणि जनतेला काँग्रेसपासून दूर ठेवणे हा होता. त्यानंतर 'उत्तर भारताची मुस्लिम अँग्लो-ओरियंटल संरक्षण सभा (*Muhammdan Anglo-Oriental Defence Association of Upper India)* स्थापन झाली जिचे उद्दिष्ट भारतातील इंग्रजी राजवटीचे समर्थन करणे आणि मुसलमानांना राजकीय प्रवाहापासून दूर ठेवणे हे होते.

भारतीय इतिहास लेखनातील जातियवाद (*Communalism in Writing of Indian History)* भारतीय इतिहासाच्या काही इंग्रज लेखकांनी हिंदू-मुसलमान प्रश्न डोळ्यासमोर ठेवून भारतीय संस्कृतीच्या विकासाचा घटनाक्रम लिहिला आणि अप्रत्यक्षरित्या साम्राज्यवादाला चालना दिली. त्यांचे अनुकरण करुन काही भारतीय इतिहासकारांनी तसेच प्रतिपादन केले. उदा. प्राचीन भारताच्या इतिहासाला हिंदू युग आणि मध्यकालीन इतिहासाला मुस्लिम युग असे संबोधून ऐतिहासिक कालखंडाचा आधार धर्म ठरविला. आपल्या राजकीय व आर्थिक उद्दिष्टपूर्तीसाठी राजा आणि प्रजा दोघांनीही धर्माचा आधार घेतलो हे खरे आहे. परंतु सर्व मुसलमान शासक होते आणि हिंदू शासित असे म्हणणे म्हणजे वस्तुस्थितीचा विपर्यास होय. मुस्लिम सत्तेच्या काळात हिंदूंचे शोषण झाले तसे व तेवढे नसले तरी सामान्य मुसलमानांचेही शोषण झाले. शासक मुस्लिम असले तरी सर्वसाधारण मुसलमान गरिब होते. पण अशाप्रकारच्या सत्याकडे पाठ फिरवून केवळ जातीय दृष्टीकोनातून लिहिल्या गेलेल्या इतिहासामुळे १९ व्या शतकाचा शेवटचा कालखंड आणि २० व्या शतकाच्या पूर्वार्धात भारतीय राजकारणाला प्रभावित केले.

### धर्मसुधारणा चळवळींचा जातियवादावर अप्रत्यक्ष परिणाम *communal side-effects of Religious Reform Movements) -*

१९ व्या शतकात झालेल्या हिंदू व मुसलमान धार्मिक सुधारणा चळवळीत काही परस्पर विरोधी तत्वे होती. आपापल्या धर्मातील जुन्या टाकावू प्रथापरंपरा बाजूला सारून धर्माला उजाळा देणे हया चळवळीचा उद्देश होता. परंतु त्यातून काही अनिष्ट तत्वे निर्माण झाली. वहींनी सर्व बिगरमुस्लिम जनतेप्रती जिहाद पुकारणे आणि देशाला दार-उल-इस्लाम बनविण्याचे स्वप्न पहाणे हिंदूंसाठी अमान्य अशीच गोष्ट होती. त्याच न्यायाने ह्या देशाला 'आर्यावर्त' बनविण्याचा काही हिंदू सुधारकांचा प्रयत्न आणि शुद्धी आंदोलनाद्वारे मुसलमानांना हिंदू धर्मात परत येण्याचे आवाहन करणे मुसलमानांना अमान्य असे होते. विवेकानंदांनी प्राचीन भारताच्या गौरवशाली परंपरेचा उल्लेख केल्यामुळे काही मुसलमान नाराज होते आणि ते आपल्या परंपरांसाठी पश्चिम आशियाच्या इतिहासाकडे पाहू लागले.

**नवीन वीरगाथा व जातियवाद** (*New Hero-myths and communal overtones)*

२० व्या शतकाच्या प्रारंभी जहालवाद्यांनी (*militant nationalists)* महाराणा प्रतापसिंह, प्रत्रपती शिवाजी व गुरु गोविंदसिंह यांना राष्ट्रपुरुष मानून त्यांच्या वीरगाथा जनतेपर्यंत पोहचविण्याचे प्रयत्न केले. मरगळ आलेल्या हिंदू समाजाला देशभक्तीने भारून टाकणे, इंग्रजांविरुद्ध लढा देण्यास तयार करणे, अन्यायाचा प्रतिकार करण्यास शिकविणे ह्यासाठी वरील आदर्श समोर ठेवण्यात आले. दृष्टी राष्ट्रवादाचीच होती पण असे करताना जाणता-अजाणता अकबर, शहाजहान, औरंगजेब इ. मुस्लिम सम्राटांना परकीय संबोधिल्यामुळे मुसलमान अस्वस्थ झाले. त्यात खतपाणी घालण्याचे कार्य मुसलमान पुढाऱ्यांनी केले व त्यातून जातीयवाद बोकाळला.

लोकमान्य टिळक, लाला लजपतराय, अरविंद घोष व नंतरच्या काळात म. गांधी हे सर्व हिंदू-मुस्लिम ऐक्याचे समर्थक होते. आपल्या भाषणांमधून जनतेला प्रबोधित करताना त्यांना समजण्यासाठी काही उदाहरणे देत. स्वाभाविकच ती हिंदू संस्कृती, परंपरांशी निगडीत अशी होती. आदर्श राज्याची कल्पना करताना गांधींनी स्वाभाविकरित्या 'रामराज्य शब्दाचा वापर केला. ते एक उदाहरण होते, लोककल्याणकारी शासनाचे प्रातिनिधीक रूप होते. वास्तविक त्यात 'जातीयता' औषधालाही नव्हती. परंतु इंग्रजांनी राईचा पर्वत केला आणि त्याला जातीयवादाचा रंग दिला व मुस्लिम पुढाऱ्यांनी ते उचलून झरने. परिणामी 'रामराज्य' हा शब्दही मुसलमानांना खटकू लागला. जातीयवादाचे विष हळूहळू पसरू लागले. एवढे की, एक वेळ अशी आली जेंव्हा तिरंगी झेंड्यासमोर नतमस्तक होण्यास मुस्लिम लिगने आक्षेप घेतला.

**सरकारी नोकऱ्यांचा जातियवाद वाढविण्यासाठी उपयोग** (*Patronage in Government Services used to Foster Communalism)*

व्यापार व उद्योगव्यवसायात ज्यांचा जम बसू शकला नाही त्यांना उदरनिर्वाहासाठी सरकारी नोकरीचा मार्ग होता. त्याचा उपयोग शासक वर्गाने आपसात द्वेष व स्पर्धा निर्माण करण्यासाठी करून घेतला. राष्ट्रीय नेत्यांनाही ही गोष्ट खटकत होती पण ते काहीच करू शकत नव्हते. हथाबाबत पं. नेहरुंनी असे उद्‌गार काढले होते. "हया विशाल आश्रयाचा (*patronage)*, उपयोग भारतात इंग्रजांची स्थिती मजबूत करण्यासाठी करून घेण्यात आला...... आपस्तत स्पर्धा व विरोध वाढण्याकरिता करून घेण्यात आला.... त्यामुळे आत्मसन्मानाला धक्का पोहचला, द्वेष वाढला आणि सरकार एका गटाला दुसऱ्या गटाविरुद्ध भडकवित राहिले." (*This enormous patronage was exercised to strengthen the British hold on the country, to crush discordant and disagreeable elements, and to promate rivalry and discord amongst various groups anxiously looking forward to employment in government service. It led to demoralization and conflict and the government could play one group against the other.)*

**सिमला शिष्टमंडळ आणि जातीय मतदारसंघाचे तत्व मान्य करणे**
*(The Simla Deputation 1 October, 1906 and Acceptance of the Principle of Communal Electorates)*

भारत सचिवापासून जिल्हयाच्या प्रशासकापर्यंत सर्व पदाधिकाऱ्यांचे हथाबाबतीत एकमत होते की, भारतात इंग्रज सत्ता टिकवून ठेवायची असेल तर काँग्रेसच्या वाढत्या शक्तीला काहीतरी प्रतिबंध असणे आवश्यक आहे. असाच एक प्रतिबंध होता जातीय मतदारसंघ म्हणजेच मुसलमानांसाठी स्वतंत्र जागांचे आरक्षण ज्यात फक्त मुसलमान मतदारच भाग घेतील. घटनात्मक सुधारणांचे वारे वाहू लागले होते त्यामुळे वरील विचाराला अतिशय महत्व प्राप्त झाले. अलीगडच्या एम. ए. ओ. कॉलेजचे प्रिंसिपॉल आर्थबोल्डच्या सूचनेवरून आगाखान एक शिष्टमंडळ घेऊन आक्टोबर १९०६ मधे लॉर्ड मिंटोला भेटले. शिष्टमंडळाला मौलाना मुहंमदअलीने 'आदेशानुसार कार्य' करण्याचा सल्ला दिला, निवेदन स्वतः आर्चबोल्डने तयार करून दिले. तसेच शिष्टमंडळ व सरकार हयांच्यात मध्यस्थाची भूमिका बजावून यश

मिळण्यासाठी प्रयत्न केले. शिष्टमंडळाने ब्रिटीश राजपदाप्रती निष्ठा व्यक्त केली व त्यांच्या सुधारणांची स्तुती केली. त्याचबरोबर संयुक्त निवडणूक पद्धती त्यांच्या हितासाठी योग्य नाही हेही स्पष्ट केले. मुसलमानांना त्यांच्या लोकसंख्येच्या आधारावर नव्हे तर त्यांचे राजकीय महत्व आणि साम्राज्याच्या रक्षणासाठी त्यांनी केलेल्या सेवेचे महत्व लक्षात घेऊन त्यांना जागा मिळाल्या पाहिजे अशीही विनंती केली. ही विनंती लॉर्ड मिंटोने मान्य केली. त्यावर भारत सचिव लॉर्ड मोर्लेने मिंटोला शाबासकी देत ५ ऑक्टोबर १९०६ रोजी लिहिले, "ज्या कुशलतेने तुम्ही परिस्थिती हाताळली त्याबद्दल येथे वृत्तपत्रे व जनता प्रशंसाच करीत आहे... सर्व काही छान सुरू आहे." (*Your address was admirable alike in spirit, in the choice of topics and in the handling.... It has been throughly appreciated here by the press and the people ---- It seems as if all had gone excellently....)* मुस्लिम लिगची स्थापना (*Foundation of the Muslim League)* सिमला शिष्टमंडळाच्या वेळी मुसलमान नेत्यांनी एक केंद्रीय मुसलमान संघटना (*Central Muhammadan Association)* स्थापन करण्याचे ठरविले, मुसलमान हितांचे रक्षण त्यामागील उद्देश होता. ३० डिसेंबर १९०६ रोजी त्यादृष्टिने भारतीय मुस्लिम लिगचे उद्‌घाटन करण्यात आले. त्याचे उद्देश पुढील प्रमाणे होते :-

(१) भारतीय मुसलमानांमधे इंग्रज सरकारप्रती राजनिष्ठेची भावना वृद्धिंगत करणे आणि सरकारच्या काही कार्याबाबत गैरसमजूत निर्माण झाल्यास ती दूर करणे,

(२) भारतीय मुसलमानांच्या राजकीय व इतर हक्कांचे संरक्षण करणे आणि त्यांच्या आकांक्षा व गरजा संयमपूर्ण शब्दात सरकारसमोर ठेवणे,

(३) वरील (१) आणि (२) मधे दिलेले उद्देश समोर ठेवून मुसलमान व इतर भारतीय जातीजमातीं- मधे सद्‌भावना निर्माण करणे.

अशा प्रकारे प्रारंभापासूनच मुस्लिम लिग एक जातीय संस्था होती ज़िचा उद्देश केवळ मुसलमानांच्या राजकीय व इतर हितांचे रक्षण करणे हा होता. मुस्लिम लिगचे हे रूप १९४७ पर्यंत तसेच होते. नबाब वक्कार-उल्-मुल्कने अलीगडला केलेल्या एका भाषणावरून लिगचा राजकीय उद्देश स्पष्ट होतो, त्या भाषणात म्हटले होते. "अल्लाच्या कृपेने असे होऊ नये की, भारतातून इंग्रज सत्ता समाप्त झाल्यावर हिंदू आमच्यावर राज्य करतील आणि आमच्या जिविताला, संपत्तीला व धर्माला धोका निर्माण होइल. हया धोक्यापासून वाचण्याचा एक मार्ग मुसलमानांसाठी आहे तो म्हणजे इंग्रज सत्ता कायम रहाण्यात सहाय्यभूत ठरणे. जर मुसलमान मनापासून इंग्रजांच्या पाठिशी राहिले तर त्यांचे राज्य यथास्थित चालेल. मुसलमानांनी स्वतःला इंग्रज सैन्य मानले पाहिजे जे ब्रिटीश राजपदासाठी आपले रक्त सांडण्यास व जीवन अर्पण करण्यास तयार आहे." (*Let the Muslims consider themselves as a British Army ready to shed their blood and sacrifice their lives for the British Crown.)*

१९१३ नंतर जवळजवळ एक दशक मुस्लिम लिगवर मौलाना मुहंमद अली, मौलाना मजहर-उल्-हक, सय्यद वजीर हुसेन, हजरत इमाम आणि महंमदअली जिना (त्यावेळी ते राष्ट्रवादी होते.) हर्याच्यासारख्या सुधारक नेत्यांचा प्रभाव होता. १९२० ते १९२३ पर्यंत मुस्लिम लिगचे विशेष असे कार्य दिसत नाही, परंतु सायमन कमिशन आणि गोलमेज परिषदांमुळे मुस्लिम लिगमधे पुन्हा चैतन्य निर्माण झाले. हयावेळेपर्यंत पूर्ण जातियवादी बनलेल्या जिनांकडे आता लिगचे सर्वमान्य आणि एकमेव नेतृत्व आले. १९३२ च्या जातीय निवाड्याने (*Communal Award)* हिंदू व मुसलमानात असलेली तेढ अधिकच वाढविण्याचे कार्य केले.

**काँग्रेसची मंत्रीमंडळे व मुस्लिम लिग (१९३७-३९)**

१९३५ च्या कायद्यानुसार पहिल्या निवडणूका १९३७ मधे झाल्या, मुस्लिम लिगनेही त्यात भाग घेऊन काही अंशी यश प्राप्त केले. मुसलमानांसाठी आरक्षित असलेल्या ४८५ जागांपैकी लिगला फक्त ११० जागा मिळविता आल्या, वायव्य सीमा प्रांत, पंजाब, सिंध, बंगालसारख्या मुस्लिम बहुल प्रांतातही इतर

विरोधी मुस्लिम पक्षांनी लिगला मागे टाकले. काँग्रेसने मुंबई, मद्रास, संयुक्त प्रांत, बिहार, ओरिसा व मध्यप्रांतात पूर्ण बहुमत मिळविले आणि वायव्य सीमा प्रांतात सर्वात मोठा पक्ष म्हणून काँग्रेस समोर आली. जुलै १९३७ मधे कॉंग्रेसने सरकारे बनविण्याचा निर्णय घेतला. मुस्लिम लिगने बंगाल, आसाम व पंजाब- मधे काँग्रेसबरोबर संमिश्र सरकारे बनविण्याची इच्छा प्रकट केली व आशा व्यक्त केली की, संयुक्त प्रांत व बिहारमधे लिगच्या सदस्यांना मंत्रीमंडळात घेतले जाईल. पण जातियवादाला विरोध करणाऱ्या काँग्रेसने ही सूचना फेटाळून लावली आणि स्पष्ट केले की, मुस्लिम लिगच्या सदस्यांना मंत्री बनायचे असेल तर त्यांना काँग्रेसच्या प्रतिज्ञा पत्रावर स्वाक्षरी करावी लागेल. काँग्रेसची ही सूचना जिनांना मान्य नव्हती. जिनाने कॉंग्रेसवर टिकेची झोड उठवून असे म्हटले की, काँग्रेस म्हणजे हिंदू संघटना आहे आणि ती अल्पसंख्यकांना चिरडू पहात आहे. आता काँग्रेसकडून मुसलमानांसाठी न्यायाची अपेक्षा करणे व्यर्थ आहे. (*Mr. Jinnah interpreted these moves of the Congress as a calculated policy against the Muslim League. He leveiled 'sweeping and fantastic' allegations against the Congress ministries, dubbed the Congress a Hindu organization out to crush all minorities. He came to the conclusion that the Muslims could expect neither justice nor fairplay from the congress ministries.)* १९३८ मधे मुस्लिम लिगने 'हिंदू काँग्रेसी प्रांतात' मुसलमानांवर होत असलेल्या अन्यायाची व अत्याचाराची चौकशी करण्यासाठी पीरपूरच्या राजाच्या नेतृत्वाखाली एक समिती नियुक्त कैली, समितीने आपल्या अहवालात मुसलमानांवर होत असलेल्या अत्याचारांचा पाढा वाचला, त्यात म्हटले होते, "कॉंग्रेस व हिंदू महासभेचा उद्देश एक आहे. जरी काँग्रेस स्वतःला जातियवादी मानत नाही आणि काही काँग्रेसी खरोखर राष्ट्रवादी धोरणाप्रमाणे आचरण करतात, पण अधिकांश काँग्रेसी हिंदू आहेत आणि अनेक शतकांच्या मुस्लिम व इंग्रज राजवटीनंतर शुद्ध हिंदू राज्य निर्माण करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे." सर्वसाधारण मुसलमानी जनमत त्यामुळे वेगळ्या चिचारांनी प्रभावित होत होते. म्हणूनच १९३९ मधे द्वितीय महायुद्ध सुरू होताच काँग्रेसच्या मंत्रीमंडळांनी राजिनामे दिले त्यावेळी मुस्लिम लिगने 'मुक्ती दिन' *(Day of Deliverance)* साजरा केला.

## द्विराष्ट्र सिद्धान्त आणि पाकिस्तान चळवळ (*The Two-Nation Theory and the Pakistan Movement)*

सामान्यतः कवि व राजकीय विचारवंत असलेला मुहम्मद इकबाल मुसलमानांसाठी स्वतंत्र पाकिस्तान मागण्याच्या विचाराचा जनक मानला जातो. १९३० च्या मुस्लिम लिगच्या अलाहाबाद अधिवेशनात इकबाल म्हणाला, "जर हा सिद्धांत मान्य केला जात असेल की, भारतातील जातीय समस्येचे कायम स्वरूपाचे उत्तर भारतीय मुसलमानांना आपला देश भारतात आपली संस्कृती व प्रथापरंपरांचा पूर्णरुपाने व स्वतंत्रपणे विकास करण्याचा अधिकार देण्यात आहे तर माझी अशी तीव्र इच्छा आहे की; पंजाब, वायव्य सीमा प्रांत, सिंध आणि बलुचिस्थान हयांचे एक राज्य निर्माण केले जावे. ब्रिटीश साम्राज्यांतर्गत अथवा बाहेर भारताच्या वायव्य सीमेवर एक स्वतंत्र मुस्लिम राज्य निर्माण करणे सध्या त्या प्रदेशातील मुसलमानांचे अंतिम ध्येय आहे."

मुसलमानांसाठी स्वतःचा देश असण्याची कल्पना केंब्रिजमधे शिकत असलेल्या रहमतअलीची होय. पंजाब, वायव्य सीमा प्रांत, काश्मीर, सिंध आणि बलुचिस्थान हयांचे एक स्वतंत्र मुस्लिम राष्ट्र व्हावे असा विचार त्याच्यासमोर होता आणि त्याला त्याने पाकिस्तान असे नावही दिले होते. रहमतअलीचे असे स्पष्टीकरण होते की, हिंदू व मुसलमान मूलतः स्वतंत्र व वेगळ्या जमाती व राष्ट्र आहेत. तो लिहितो, "आमचा धर्म, संस्कृती, इतिहास, परंपरा, साहित्य, अर्थपद्धती, वंशनियम, वारसाहक्क आणि विवाह पूर्णपणे व मुळापासून हिंदूंपेक्षा वेगळे आहे. छोट्या छोट्या गोष्टींमधेही

हे वेगळेपण दिसून येते. आम्ही मुसलमान व हिंदू एकत्र भोजन घेत नाही, व परस्पर विवाहसंबंध नाही. आमचे राष्ट्रीय रितीरिवाज, पंचांग, खाणेपिणे, पोशाख सर्व काही वेगळे आहे."

हिंदू व मुसलमान स्वतंत्र जमाती (*nationalities)* आहेत अशी स्पष्ट घोषणा जिनाने मार्च १९४० च्या अधिवेशनात केली. लिगच्या त्या अधिवेशनात जिना म्हणाले, "हिंदू व मुसलमान है शब्द केवळ धर्म दर्शवित नाहीत तर स्वतंत्र व वेगळी सामाजिक व्यवस्था दर्शवितात, हिंदू व मुसलमानांचे एक राष्ट्र बनेल हे केवळ स्वप्नरंजन होय... हवा दोघांचे धार्मिक तत्वज्ञान, सामाजिक रितीरिवाज, साहित्य सर्वकाही वेगळे आहे.... अशा दोन जमातींना एका राज्यसूत्रात बांधणे ज्यात एक अल्पसंख्यांक आहे आणि दुसरी बहुसंख्यांक..... म्हणजे असंतोष वाढविणे आणि अंती राष्ट्राचा विनाश होय."

भारताच्या फाळणीची मागणी करताना मुस्लिम लिगने पुढील ठराव संमत केला, "मुस्लिम लिगचे हे अधिवेशन असा दृढ निर्णय घेते की, हया देशाची कोणतीही घटनात्मक योजना (*constitutional plan)* सफल होणार नाही तसेच मुसलमानांना मान्य होणार नाही जी खालील तत्वांवर आधारित नसेल भौगोलिकदृष्ट्या एकमेकांना लागून असलेल्या प्रदेशांचे आवश्यक बदलांसह अशा प्रकारे पुनर्संघटन केले जावे जेणेकरून मुस्लिम बहुसंख्य प्रदेश (उदाः- वायव्येकडील तसेच पूर्वेकडील प्रदेश) एकत्र येऊन एक स्वतंत्र, सार्वभौम राज्य बनविणे शक्य होईल." मात्र त्या ठरावात प्रदेशांचे विवरण दिले नव्हते. पुढे १९४२ मधे जिनाने कूपलैंडला दिलेल्या स्पष्टीकरणात असे म्हटले की, "पाकिस्तान एक मुस्लिम राज्य राहील आणि भारताच्या एका बाजूला वायव्य सीमा प्रांत, पंजाब व सिंध असतील आणि दुसऱ्या बाजूला बंगाल." त्यात बलुचिस्थान, आसामचा उल्लेख नव्हता तसेच काश्मीर व हैद्राबादचे नाव नव्हते. मात्र १२ मार्च १९४६ रोजी मुस्लिम लिगने कॅबिनेट मिशनला दिलेल्या मागणीपत्राप्त पंजाब, वायव्य सीमा प्रांत, बलुचिस्थान, सिंध, बंगाल आणि आसाम हथा सहा प्रांतांचा उल्लेख व समावेश केला होता. अशाप्रकारे मुस्लिम लिगच्या १९४० च्या लाहोर अधिवेशनात पाकिस्तानचौं छाया दिसून आली.

हयानंतरच्या काळात पाकिस्तानची मागणी भारतीय मुसलमानांसाठी कुराणाप्रमाणे श्रद्धेची बाब झाली. (*Thus the Lahore session of the Muslim League gave it an Ambition and a Programme. Henceforth the demand for Pakistan became as much as an article of faith for the Indian Muslims as their holy book, the Koran.)*

## **हिंदू महासभा** (*The Hindu Mahasabha)*

भारतात जातीय समजल्या गेलेल्या संस्था निर्माण व विकसित होण्यासाठी ब्रिटीशांचे साम्राज्यवादी धोरण कारणीभूत ठरले. विशिष्ट जमातीच्या हितरक्षणासाठी स्थापन झालेल्या अशा संस्था वैयक्तीकरित्या त्याच्या नेत्याची आकांक्षापूर्ती करीत असतानां अप्रत्यक्षपणे ब्रिटीश साम्राज्याला सहाय्यभूत ठरत होत्या. हिंदू महासभा, मुस्लिम लिग, अकाली दल, दलित जाती संघटना त्याला अपवाद नव्हत्या. हिंदू महासभेच्या उदयाविषयी नेमकी माहिती नाही. १९१० मधे अलाहाबादच्या प्रमुख हिंदूंनी अखिल भारतीय हिंदू महासभा स्थापन करण्याचा निश्चय केला. १९११ मधे पंजाब हिंदू महासभेने अमृतसर येथे हिंदू अधिवेशन आयोजित केले. हिंदू महासभेचे कार्यालय हरिद्वार येथे ठेवण्यात आले आणि महत्वाच्या हिंदू मेळयांच्या प्रसंगी अधिवेशन घ्यावे असे ठरविण्यात आले.

१९२२ मधे असहकार चळवळ थांबल्यानंतर मलबार आणि मुल्तानमधे व्यापक प्रमाणावर जातीय दंगली होऊन त्यात प्रचंड प्रमाणावर हिंदू जिविताचे व मालमत्तेचे नुकसान झाले. हिंदूंना स्वसंरक्षणासाठी संघटित करण्याचे प्रयत्न सुरू झाले. हिंदू महासभेची स्थापना करताना त्याचे महत्व प्रतिपादित करीत पंडित मदनमोहन मालविय म्हणाले, "मुसलमान आणि खिश्चन अनेक शतकांपासून आपल्या धर्मप्रसाराचे कार्य करीत आहेत. भारतातील बहुसंख्य मुसलमान धर्मपरिवर्तीत हिंदू आहेत, हे थांबविण्यासाठी एक हिंदू मिशन (प्रचारक संस्था) स्थापन करणे आवश्यक आहे." त्याचप्रमाणे स्थानिक मंडळांमधे जास्त प्रतिनिधीत्व मिळण्याच्या मुस्लिम लिगच्या मागणीला अडवून

धरण्यासाठी हिंदू संघटनेचे महत्व मालवियांनी स्पष्ट केले. प्रारंभिच्या काळात 'शुद्धी व संघटन ही हिंदू महासभेची उद्दिष्टे होती, त्याचप्रमाणे मालवियांनी हवा चळवळीच्या आर्थिक, सामाजिक उद्देशांवरही भर दिला. कॉंग्रेसचे कार्य प्रामुख्याने राजकीय क्षेत्रात असल्याने सामाजिक, सांस्कृतिक आणि बिगर राजकीय क्षेत्रात फारसे कार्य नव्हते. म्हणून हिंदू समाजातील जातीप्रथा, बालविवाह, अस्पृश्यता इ. सामाजिक अनिष्ट प्रथा दूर करण्याकरिता हिंदू महासभेचे संघटन करण्यात आले. पं. मदनमोहन मालवियांनी ही बाब स्पष्ट केली होती की, "हिंदू महासभा काँग्रेसची प्रतिस्पर्धी नसून काँग्रेसच्या कार्याला पूरक ठरेल व काँग्रेस सुदृढ बनेल ह्यासाठी स्थापन करण्यात आली (*the Hindu Mahasabha did not in any way clash with the Congress but was planned to supplement and strengthen the Indian National Congress.)*

त्यावेळी एक धारणा अशी होती की, मुस्लिम लिग, अकाली दल व इतर जातीय संस्थांप्रमाणे हिंदू महासभा एक होती आणि तिचा सामाजिक व सांस्कृतिक उत्थानाचा दावा पोकळ होता. १९३८ मधे स्वातंत्र्यवीर सावरकर हिंदू महासभेचे अध्यक्ष निवडले गेले व त्या पदावर अनेक वर्षे राहिले. त्यांच्या नेतृत्वाखाली सभेने एक राजकीय कार्यक्रम तयार केला होते. काँग्रेसच्या मुसलमानांना खूष ठेवण्याच्या धोरणामुळे नाराज झालेल्या सावरकरांनी 'हिंदू राष्ट्राची गर्जना केली. सावरकरांचे असे म्हणणे होते की, हथा देशाला मातृभूमि मानणा-यांचा हा देश आहे. मुसलमान तसेच इतर अल्पसंख्याकांनी अल्पसंख्यांकासारखेच रहायला हवे. लोकशाहीच्या तत्वानुसार बहुसंख्यकांची भाषा राष्ट्रभाषा असावी असे सावरकरांचे मत होते. अर्थात भारत हिंदूंचा देश असला तरी इतरांना येथे न्याय मिळेल. त्यासाठी त्यांनी एक व्यक्ती एक मत ह्या सिद्धांताचा पुरस्कार केला.

सावरकरांनंतर श्यामाप्रसाद मुखर्जी हिंदू महासभेचे अध्यक्ष बनले. त्यांनी सभेला व्यापक राष्ट्रीय दृष्टी दिली. मात्र मुसलमानांमधे मुस्लिम लिग लोकप्रिय झाली तशी हिंदूंमधे हिंदू महासभा लोकप्रिय होऊ शकली नाही. हयाला कारणही तसेच होते. हिंदू महासभेच्या कितीतरी आधीपासून काँग्रेसने भारतातील सर्वच जनजातीचे नेतृत्व केले व स्वातंत्र्य चळवळ चालविली. हिंदूंमधे एक स्वाभाविक भावना होती की, एक संघटना असताना दुसरी असण्याचे कारण काय? शिवाय मुस्लिम लिगने स्वतंत्र पाकिस्तानची मागणी केल्याने देशातील बहुसंख्य मुसलमान लिगचे समर्थक बनले. लिगने केलेल्या पाकिस्तानच्या मागणीला प्रतिरोध म्हणून 'अखंड हिंदुस्थान' चा नारा देऊनही तेवढी लोकप्रियता हिंदू महासभेच्या वाट्याला आली नाही.

हिंदू महासभेने भारतात हिंदू जमात, हिंदू संस्कृती, हिंदू राष्ट्र अशी केलेली मागणी पाहून मुस्लिम लिगची पाकिस्तानची मागणी अधिकाधिक जोर धरू लागली, मुस्लिम लिग म्हणजे पहिली जातीय संस्था होती आणि तिचे वीष दिवसेंदिवस पसरत चालले होते. मात्र हिंदू महासभा व तद्वत अन्य संस्था आपआपसात विरोध प्रदर्शित करून आपली शक्ती खच्ची करीत होत्या.

**द्वितीय महायुध्द आणि पकिस्तान योजनेची प्रगती.**

## *(The Second World war and Furtherance of the Pakistan plan)*

ऑगस्ट प्रस्ताव, १९४० (*The August offer)* युध्दानंतर ताबडतोब स्वातंत्र्य मिळावे आणि आता अंतरिम राष्ट्रीय सरकारची स्थापना व्हावी तरच युध्दात पूर्ण सहकार्य मिळेल हया काँग्रेसच्या मागणीवर व्हाईसरॉय लिन लिथगोने ऑगस्ट १९४० चा प्रस्ताव ठेवला ज्यात युध्दानंतर घटना समिती स्थापन करण्याबाबत म्हटले होते. पण त्याचबरोबर अल्पसंख्यकांना आश्वासन देण्यात आले की, इंग्रज सरकार कोणत्याही अशा राज्यपध्दतीचे समर्थन करणार नाही ज्यात त्यातील सरकारचा अधिकार देशातील एक प्रमुख जमात मान्य करणार नाही. हथा आश्वासनाचे स्वागत करून मुस्लिम लिगने एक ठराव संमत केला ज्यात म्हटले होते, "भारताच्या भावी संविधानाच्या कठीण प्रश्नाचे एकचं उत्तर आहे आणि ते म्हणजे फाळणी." (*The partition of India is the only solution of the most difficult problem of India's future constitution.)*

**क्रिप्स मंडळ (१९४२) आणि फुटीर शक्तींना चालना** (*Cripps Mission and Encouragement to✓ Separatist Forces)*

मुस्लिम लिगच्या भारताच्या फाळणीच्या मागणीला क्रिप्स योजनेने अधिक चालना दिली. सरकारने जाहीर केलेल्या प्रस्तावात हे स्पष्ट होते की, युद्धानंतर बनविल्या गेलेल्या घटनेला खालील अटींवर स्विकृत केले जाईल

(१) ब्रिटीश भारतातील कोणताही प्रांत संविधान न स्विकारता आपली स्थिती कायम ठेवू इच्छित असेल तर त्याला तसे स्वातंत्र्य आहे आणि कालांतराने इच्छा झाल्यास भारतीय संघ राज्यात विलिन होता येईल.

(२) अशा विलिन न होणाऱ्या प्रांतांची इच्छा असल्यास इंग्रज सरकार त्यांच्याकरिता नव्या संविधानाला मान्यता देईल आणि त्याला भारतीय संघराज्याच्या बरोबरीचा दर्जा असेल. परंतु मुस्लिम लिगने क्रिप्स योजना फेटाळून लावली आणि पाकिस्तानच्या बेजनेचा पुनरुच्चार केला.

**वेव्हेल योजना (१९४५) व जातीय पेंच** (*Wavell Plan and Communal Impasse)*

१४ जून १९४५ रोजी भारत सचिव एमरीने कॉमन्स सभागृहात घोषणा केली की, मार्च १९४२ चा प्रस्ताव कोणताही बदल न करता कायम आहे आणि मुख्य सेनापती वगळता गव्हर्नर जनरलच्या कौन्सिल सदस्यांची (कार्यकारी मंडळ) नियुक्ती भारतीय राजकीय नेत्यांमधून केली जाऊ शकते. त्यात हिंदू व, मुसलमानांचे समान प्रतिनिधी रहातील. लॉर्ड वेव्हेलने सिमला येथे जून-जुलै १९४५ मधे एक संमेलन बोलाविले जेणेकरून कॉंग्रेस व लिगमधील मतभेद दूर होऊ शकतील, कॉंग्रेसने आपल्याकडून दोन कॉंग्रेसी मुसलमान नियुक्त करण्याचा प्रस्ताव ठेवला. पण त्यावर जिनाने अशी भूमिका घेतली की, सर्व मुसलमान सदस्य लिगकडून मनोनीत केले जावे. अशाप्रकारे गतिरोध निर्माण झाल्याने वेव्हेलने संमेलन समाप्त केले आणि दाखवून दिले की, भारताची घटनात्मक प्रगती रोखण्याचा अधिकार जणूकाही जिनाला आहे. (-*giving the general impression that Jinnah had been given the veto to torpedo all constitutional advance in India.)* त्रिमंत्री मंडळ (१९४६) आणि जातीय गुंतागुंत (*The Cabinet Mission and the Communal Tangle)* १९४५-४६ च्या निवडणूकांमधे मुस्लिम लिगने वायव्य सीमा प्रांत वगळता उर्वरित सर्व मुस्लिम बहुसंख्य प्रांतात खूप जास्त जागी विजय संपादन केला. लिगला मुसलमानांची ७५% मते मिळाली. सर्व हिंदू बहुल प्रांतात आणि वायव्य सीमा प्रांतात कॉंग्रेसने मंत्रीमंडळे बनविली तर लिगची मंत्रीमंडळे बंगाल व सिंधमधे आली. पंजाबमधे सर्वात मोठा पक्ष मुस्लिम लिग असला तरी मंत्रीमंडळ मात्र युनियनिस्ट पक्षाने इतर पक्षांच्या सहाय्याने बनविले. एकूण चित्र असे होते की, लिग एक मजबूत राजकीय पक्ष आहे.

मार्च १९४६ मधे भारत सचिव पेथिक लॉरेन्स, व्यापार मंडळाचा अध्यक्ष स्टेफर्ड क्रिप्स आणि नौदलातील ए. व्ही. अलेक्झांडर ह्यांचा समावेश असलेले त्रिमंत्री मंडळ भारतात पोहचले. लॉर्ड ॲटलीने हे स्पष्ट केले होते की, अल्पसंख्यांक पक्षाला बहुसंख्यांक पक्षाच्या प्रगतीतील अडसर बनू दिला जाणार नाही.

त्रिमंत्री मंडळाने पाकिस्तानची मागणी नामंजूर करून एक केंद्रीय सरकार असावे आणि त्याच्या नियंत्रणाखाली संरक्षण, परराष्ट्र संबंध व संचार व्यवस्था असावी अशी सूचना केली, पण त्याचबरोबर लिगची मागणी अंशतः स्विकारली आणि प्रांतांना तीन भागात वाटण्याची सूचना केली. मदास, मुंबई. मध्यप्रांत, संयुक्त प्रांत, बिहार व ओरिसा हे हिंदू बहुल प्रांत (*Hindu majority provinces)* 'अ' गटात; पंजाब, वायव्य सीमा प्रांत आणि सिंध हे मुस्लिम बहुल प्रांत 'ब' गटात; आणि बंगाल व आसाम 'क' गटात अशी व्यवस्था होती. प्रांतांना पूर्ण स्वायत्तता देणे आणि गट बनविण्याची तरतूद हयातून मुस्लिम लिगला पाकिस्तानचे सार मिळाले. (*The full autonomy to the provinces and the provision for Grouping gave to the Muslim League 'the substance of Pakistan.")* ह्याशिवाय घटना समिती निवडण्याची प्रक्रिया निश्चित करण्यात आली आणि त्यानुसार झालेल्या निवडणूकीत सर्वसामान्य २१० जागांपैकी १९९ जागा कॉंग्रेसला मिळाल्या आणि

मुसलमानांसाठी असलेल्या ७८ जागांपैकी ७३ जागा मुस्लिम लिगा मिळाल्या. ज्यावेळी वस्तुस्थिती जिनाच्या लक्षात आली की, एकूण २९६ जागांपैकी काँग्रेसला २११ चे समर्थन मिळेल आणि मुस्लिम लिग अल्पमताप्त जाईल त्यावेळी दोन घटना समितींची मागणी पुढे करण्यात आली; एक भारतासाठी व एक पाकिस्तानसाठी, प्रत्यक्ष कार्यवाही आणि जातीय दंगली, १९४६-४७ (*Direct Action and Communal, Riots)* त्रिमंत्री योजनेला दिलेली मंजूरी फेटाळून लावीत मुस्लिम लिगने १६ पुस्ट १९४६ हा 'प्रत्यक्ष कार्यवाही दिवस' *(Direct Action Day)* साजरा केला, हयामागील उद्देश पाकिस्तानसाठी इंग्रजांवर नव्हे तर हिंदूंवर दबाव आणणे हा होता. बंगाल, संयुक्त प्रांत, मुंबई, पंजाब, सिंध आणि वायव्य सीमा प्रांतांत लिगने जातीय दंगली घडवून आणल्या.

पं. जवाहरलाल नेहरूंच्या नेतृत्वाखाली बनलेल्या अंतरिम सरकार मधे सामील होण्यास सुरूवातीला लिगने नकार दिला पण नंतर २६ ऑक्टोबर १९४६ ला लिग सहभागी झाली. त्या मागील हेतू अंतरिम सरकार यशस्वी बनविण्याचा नसून आतून तोडण्याचा होता तसेच घटना समितीत घेण्यासही लिगने नकार दिला.

**ॲटलीची घोषणा (२० फेब्रुवारी १९४७)** *Divide and Quit Policy*

कॉमन्स सभागृहात केलेल्या एका घोषणेद्वारे ॲटलीने हे स्पष्ट केले की, जून १९४८ पूर्वी सार्वभौम सत्ता भारतियांकडे सोपविण्याचा सरकारचा निश्चय आहे, जर मुस्लिम लिग सहकार्य देणार नसेल तर, 'ब्रिटीश सरकारला विचार करावा लागेल की, इंग्रज प्रदेशांची केंद्रीय सत्ता ठरलेल्या तारखेपर्यंत कोणाकडे सोपवावयाची. संपूर्ण सत्ता कोणत्या तरी केंद्र सरकारकडे किंवा इतर प्रदेशातील प्रांतीय सरकारकडे किंवा इतर मार्ग जो योग्य असेल व भारतीयांच्या हिताचा असेल." अशा प्रकारे भारताचे ऐक्य कायम राखण्याच्या इंग्रजांच्या मनोवृत्तीत बदल झालेला दिसतो.,

**माऊंटबॅटन योजना (३ जून १९४७) भारताच्या फाळणीची योजना** (*Mountbatten Plan of Partition of India)*

वेव्हेलच्या जागी मार्च १९४७ मधे व्हाईसरॉय बनलेल्या लॉर्ड माऊंटबॅटनने ३ जून १९४७ च्या घोषणेद्वारा भारताच्या फाळणीचा संकेत दिला. त्यानुसार वायव्य सीमा प्रांतात लोकमताद्वारे (*Referendum)* भारतात अथवा पाकिस्तानात सामील होण्यासंबंधी निर्णय घ्यावयाचा होता. त्याच पद्धतीने असामामधील मुस्लिम बहुसंख्य सिल्हट जिल्हयाला निर्णय घ्यावयाचा होता की, भारतात सामील होणे अथवा पूर्व बंगालमधे. मुस्लिम बहुल प्रदेशांचे प्रतिनिधी आणि इतर प्रदेशांच्या प्रतिनिधींनी आपल्या प्रांताची फाळणी करावयाची अथवा नाही हे ठरवावयाचे होते. अपेक्षेप्रमाणे हया दोन्ही प्रांतांच्या हिंदू बहुल प्रदेशांच्या प्रतिनिधींनी प्रांताच्या फाळणीच्या बाजूने कौल दिला. पूर्व बंगाल आणि पश्चिम पंजाबने पाकिस्तानात तर पश्चिम बंगाल व पूर्व पंजाबने भारतात सामील होण्याचा निर्णय घेतला. सिल्हट आणि वायव्य सीमा प्रांतातील लोकमताने पाकिस्तानच्या बाजूने कौल दिला.

भारताच्या स्वातंत्र्याचा कायदा आणि भारताची फाळणी (*The Indian Independence Act and Partition of India) misuf* भारतीय स्वातंत्र्याचा कायदा इंग्लंडच्या संसदेत जुलै १९४७ मधे संमत करण्यात आला आणि त्याप्रमाणे १५ ऑगस्ट १९४७ पासून भारत आणि पाकिस्तान असे भारताचे दोन तुकडे झाले. भारताची फाळणी अटळ होती? *(Was the Partition of India Inevitable and Unavoidable?* 1906 प्रको ह्या प्रश्नाचे उत्तर लेखक कोण भारतीय, पाकिस्तानी किंवा इंग्रज हयावर अवलंबून आहे.

भारतात देशाची फाळणी दुर्दैवी घटना मानली जाते. इंग्रजांची जुनी चाल फुट पाडा व राज्य करा' *(Divide and Rule)* तसेच मुस्लिम लिगची जातीयता व अलगपणाच्या आदर्शाचा तो एक स्वाभाविक अंतिम टप्पा होता. (*It is projected as the logical culmination of the ing British Policy of Divide and Rule and the Muslim League's ideology long-stand- commu-*

*nalism and separateness.)* हया दोन्ही प्रवृत्तीनी परस्पर सहकार्याने काम केले व फाळणी स्विकारण्यास काँग्रेसला बाध्य केले. अनेक भारतीय लेखक हयाबाबत कॉग्रेसच्या नेत्यांना दोष देतात. त्यांनी कणखर भूमिका घेतली असती व मुत्सद्दीपणा दाखविला असता तर फाळणी टळू शकली असती असे हवा लेखकांचे मत आहे, पाकिस्तानात मात्र फाळणीला तर्कसंगत व आवश्यक मानले जाते. मुस्लिम राष्ट्रवाद भारताच्या इतिहासात अंतर्भूत होता असा त्यांचा युक्तिवाद आहे. फाळणीबाबत इंग्रज लेखकातही एकमत नाही. भारतात असलेले इंग्रज पदाधिकारी वेगवेगळे मतप्रदर्शन करतात.

मुस्लीम राष्ट्रवाद भारताचा इतिहासात असा त्यांया युक्तीवाद जातियवादाचा विकास आणि भारताची फाळणी आहे. अर्थात परिणाम व कारणे काहीही असलीत तरी परिस्थितीचा अचूक फायदा घेणाऱ्या जिनालाच फाळणीचे श्रेय दिले जाते. जिनाची ताकद दिवसेंदिवस जास्तच वाढत गेली आणि शेवटी त्यांना कायदा-इ-आझम (*Great Organiser)* म्हटले जाऊ लागले. पं. नेहरूंच्या मते मुसलमानांमधे मध्यम वर्गाचा उदय उशीरा झाल्याने जातियतेची भावना बळावत गेली आणि संधीचा फायदा घेत लिगने मुसलमानांमधे मितीची भावना निर्माण केली. इस्लाम खतरेमे' *(Islam in danger)* ह्या नाऱ्यामुळे सर्व मुसलमान लिगच्या झेंड्याखाली एकत्र आले. जिना त्यांच्याकरिता प्रेषित बनले.

हिंदू महासभेच्या चुकांमुळे व कार्यामुळे जातीयवाद आणि अलगपणाची भावना वाढली अशी टिका केली जाते. विशेषतः सावरकरांचे मत की, "हा हिंदूंचा देश आहे आणि येथे मुसलमानांनी अल्पसंख्यकांप्रमाणेच राहिले पाहिजे कारण लोकशाहीत बहुमताची सत्ता असते. "ह्वामुळे प्रक्षोभ निर्माण झाला असे म्हटले जाते.

"त्यानंतरचा इतिहास पहाता हिंदू महासभेला किंवा स्वातंत्र्यवीर सावरकरांना दोषी ठरविणे योग्य होणार नाही. परिस्थितीचे दडपण आल्याने काँग्रेसने फाळणीला मान्यता दिली ही वस्तुस्थिती आहे. हा हिंदूंचा देश आहे हयाबद्दल कोणाचेच दुमत असू नये, तरीही मुसलमानांना पाकिस्तान दिला हथामागे उरलेल्या भारतात तरी हिंदूंना स्वतंत्र जीवन जगता यावे ही भावना होती. पण इतिहासाकडे पहाता तसे घडले नाही. पाकिस्तान देणे 'तर्कसंगत व न्यायसंगत' होते तर त्याच सिद्धांताचा आधार घेऊन पाकिस्तानने शांत रहाणे आवश्यक होते. पण त्यानंतर काश्मीर व अन्य प्रदेशांसाठी पाकिस्तानची घुसखोरी सुरूच राहिली, पुन्हः तोच खेळ सुरू झाला; कत्लेआम सुरू झाले. त्यामुळे हा देश हिंदूंचा आहे हे ठणकावून सांगण्याची वेळ आली. ६०-७० वर्षांनंतर जे सांगण्याची वेळ आलेली आहे ते आधीच हिंदू महासभेने व सावरकरांनी सांगितले त्याबद्दल त्यांना दोषी ठरविणे म्हणजे इतिहासाची विटंबना आहे."

**निवडक विचार**

जवाहरलाल नेहरू मला असे वाटते की, हे घटनांचे न टाळता येण्यासारखे दडपण होते आणि, ज्याप्रकारे आम्ही जात होतो त्या दलदलीच्या व प्रतिरोधाच्या मार्गातून बाहेर येणे शक्य नव्हते आणि परिस्थिती बिघडतच गेली. (*I suppose it was the compulsion of events and the feeling that we would'nt get out of that deadlock or morass by pursuing the way we had done; it became worse and worse.)* याशिवाय असे वाटत होते की, संघराज्याच्या घटकांकडे जास्त सत्ता असल्यामुळे स्वातंत्र्य मिळाले तरी, भारत एक दुर्बल देश बनेल, तशा विशाल भारतात सतत भांडणे होत राहिली असती आणि विघटनकारी तत्वे कार्यरत राहिली असती. त्याशिवाय आम्हाला नजिकच्या भविष्यकाळात, स्वातंत्र्य मिळविण्याचा दुसरा मार्ग दिसत नव्हता, म्हणूनच आम्ही त्याला मान्यता देऊन सुदृढ भारत निर्माण करण्याचे आवाहन केले आणि काही त्यात सामील होऊ इच्छित नाही तर आम्ही त्यांना तसे करण्यास बाध्य करू शकत नव्हतो.

सरदार वल्लभभाई पटेल मला असे दिसून आले की, भारताची फाळणी आम्ही मान्य केली नसती तर भारत लहान लहान तुकडयात विभागला गेला असता आणि पूर्णतः नष्ट झाला असता. माझ्या एका वर्षाच्या अनुभवाने (मंत्रीपद) माझी खात्री होऊन चुकली होती की, आम्ही ज्या मार्गावरून समोर जात होतो तो पूर्णपणे विनाशाचा मार्ग होता. आम्हाला एक नाही तर अनेक पाकिस्तान दिसले असते. आमच्या प्रत्येक कार्यालयात पाकिस्तानी घटक होता.

*(I felt that if we did not accept partition, India would be split up into many bits and would be completely ruined. My experience of office for one year convinced me that the way we have been proceeding would lead us to disaster. We would not have had one Pakistan but several. We would have had Pakistan cells in every office.)*

सी. एच. फिलिप्स - कॉंग्रेस आणि मुस्लिम लिगमधे वाढत असलेल्या मतभेदांमुळे असा गतिरोध उत्पन्न झाला जो १९४२ ची क्रिप्स योजना, १९४६ ची तीनू स्तरीय योजना अशा स्वरूपाचे इंग्रजांकडून प्रस्ताव येऊनही संपूर्ण युद्धकाळात कायम राहिला, हचावेळेपर्यंत जबबिदीर सरकार आणि भारताचे ऐक्य छ्यावर भर देणारे इंग्रज आपले म्हणणे कॉंग्रेसच्या व मुस्लिम लिगच्या गळी उतरविण्यात अयशस्वी झाले. भारतीयांना सत्तासंघर्षाची चिंता होती तर मुस्लिम लिग प्रातिनिधीक सरकारच्या परिणामांविषयी चिंतीत होती. आपले लष्करी व नागरी नियंत्रण कमी होत आहे तसेच देशात शांतता व सुव्यवस्थेची स्थिती राहिलेली नाही हे लक्षात येताच इंग्रज सरकारने फेब्रुवारी १९४७ मधे अशी घोषणा केली की, जून १९४८ च्या पूर्वी सत्तेचे हस्तांतरण केले जाईल. शेवटी स्वातंत्र्य मिळविण्याच्या घाईत भारताची फाळणी झाली.

हॅरॉल्ड लास्की *But as long as every vested interest in India is, like the Moslem interest, encouraged, openly or secretly, to believe that it will get better terms for independence from us than from a real attempt at accommodation with other inter- ests, of course agreement between them is not forthcoming......in the same way, though more subtly is the conservative party has long patronised the separation of ulster, and with the same evil consequences.*

ॲलन कॅम्पबेल जॉन्सन काळाची मर्यादा (ॲटलीने सत्तांतरासाठी दिलेली जून १९४८ पर्यंत) वास्तविक युद्धाच्या सुरुवातीच्या दिवसात इंग्रजांनी भारतीय मुलकी सेवेत भरती बंद करण्याचा स्वाभाविक परिणाम होता. हया सेवेत कर्मचाऱ्यांची संख्या अंदाजे ११०० पेक्षा जास्त रहात नव्हती, नोव्हेंबर १९४६ पर्यंत फक्त मुख्य ५२० इंग्रज अधिकारी व उरलेले भारतीय अशी स्थिती होती, नोकरशाहीचे कार्य वाढत गेले आणि तुलनेत इंग्रज अधिकारी कमी होत गेल्याने भारतावर प्रशासन करणे १९४९ नंतर शक्य नाही हे स्पष्ट झाले होते. जी गोष्ट दोनही प्रमुख राजकीय पक्षांना मान्य नाही ती त्यांना स्विकारण्यास बाध्य करण्यास १९४७ मधे पोलिस दलही तेवढे शक्तीशाली नव्हते. तसेच भारतात सत्ता टिकवून ठेवण्यास लष्कराचा वापर करायला ब्रिटीश सरकार किंवा तेथील जनतेची मनःपूर्वक तयारी नव्हती. ( *the tremendous bureaucratic growth of work coinciding with the decline in the number of British senior officials made it clear, quite apart from other considerations, that it was going to be virtually Impossible to hold to India administratively beyond 1949. It is doubtful whether the police establishment was strong enough by 1947 to enforce any policy opposed by both major parties, and it is fair to say that any large military commit- ments in India to maintain the Raj would have been wholly unacceptable to the British Government or people.)*